राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान या योजनेसाठी सन २०१७-१८ करीता केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा (एकत्रित) रु. ३८१.५१ लक्ष इतका निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: आरएमएसए २०१७/(८५/१७)/एस.डी.६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, विस्तार भवन,
मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २२ मार्च, २०१८.

<u>वाचा-</u> १) विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २४१७/(४६/१७)/अर्थसंकल्प, दि.१०.८.२०१७.
२) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७
३) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३०.६.२०१७.
४) मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि.१४.०३.२०१८ चे पत्र.
५) विभागाचा शासन निर्णय क्रमांकः आरएमएसए-२०१७/(८५/१७)/एसडी-६, दि. ०१.०३.२०१८.

<u>प्रस्तावना -</u>

केंद्र शासनाच्या अकराव्या व बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान सुरु करण्यात आले आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून, या योजनेचे स्वरुप केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असे आहे. केंद्र शासनाने दि. १४ मार्च, २०१८ च्या आदेशान्वये सदर योजनेसाठी अनुसूचित जाती उपयोजनेसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात, Recurring Component मधील उपक्रमांसाठी केंद्र शासनाकडून रू. २७५.५३ लक्ष इतका निधी वितरित केला आहे. सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून वितरित करण्यात आलेल्या निधीच्या प्रमाणात राज्य शासनाचा हिस्सा रु. १८३.६९ लक्ष इतका येतो. परंतु, सदर योजनेसाठी (SC करिता) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात यापूर्वी रू. १२७.४ लक्ष इतका निधी २२०२ I२९२ (राज्य हिस्सा) या लेखाशिर्षा अंतर्गत आणि रू.१९१.०९ लक्ष इतका निधी २२०२ I२८१ (केंद्र हिस्सा) या लेखाशिर्षा अंतर्गत वितरीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर योजनेसाठी (SC करिता) २२०२ I२९२ (राज्य हिस्सा) या लेखाशिर्षा अंतर्गत रु. १७२.६ लक्ष व २२०२ I२८१ (केंद्र हिस्सा) या लेखाशिर्षा अंतर्गत रु. २०८.९१ लक्ष इतका निधी वितरणासाठी उपलब्ध आहे. त्यानुसार केंद्र हिस्सा रु. २०८.९१ लक्ष व राज्य हिस्सा रु. १७२.६ लक्ष असा एकूण रु. ३८१.५१ लक्ष इतका निधी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान योजनेसाठी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये प्रभावीपणे होण्याकरीता सन २०१७-१८ मध्ये केंद्र हिस्सा रु. २०८.९१ लक्ष व राज्य हिस्सा रु. १७२.६ लक्ष असा एकूण रु. ३८१.५१ लक्ष (अक्षरी रूपये तीन कोटी एक्याऐंशी लक्ष एकावन्न हजार फक्त) निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्र.ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ७८९, अनुसूचित जाती उपयोजना, (०१)(०३) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (अनुसूचित जाती उपयोजना) (केंद्र हिस्सा) (२२०२ आय२८१) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध तरतुदीतून रु. २०८.९१ लक्ष इतका निधी वितरित करण्यात यावा.

मागणी क्र.ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ७८९, अनुसूचित जाती उपयोजना, (०१)(०४) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (अनुसूचित जाती उपयोजना) (राज्य हिस्सा) (२२०२ आय२९२) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध तरतुदीतून रु. १७२.६ लक्ष इतका निधी वितरित करण्यात यावा.

३. वरील खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८.४.२०१७ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा. यासाठी सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी, तसेच अवर सचिव/कार्यासन अधिकारी(रोखशाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि. १८.४.२०१७ व दि. ३०.६.२०१७ च्या परिपत्रकास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभागाच्या दि. १८.४.२०१७ परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. परिपत्रकातील परिच्छेद क्र.१८ नुसार केंद्र शासनाचा निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला असल्याचे अभिप्राय वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.१२०/अर्थोपाय, दि.१५.०३.२०१८ अन्वये दिलेले आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२२१२२९५१५७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suryakant B. Patil

Digitally signed by Suryakant B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e4d61e2654004fd87056f70e5ae32fb1d62013750a34b063c53c71f673388b9, cn=Suryakant B. Patil
Date: 2018.03.22 12:46:56 +05'30'

(सुर्यकांत पाटील)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे.
७) सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सहसंचालक (प्रकल्प), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.
११) संचालक, लेखा व कोषागारे, पुणे.
१२) वरिष्ठ कोषाधिकारी, जिल्हा पुणे.
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/वांद्रे
१४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१५) शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद(सर्व)
१६) वित्त विभाग, (व्यय-५/अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.
१७) कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/रोखशाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) निवड नस्ती, एसडी-६.